पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

## प्रेस नोट

**परीमंडळ ३ पुणे शहर विभागातील दत्तवाडी पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहर पोलीस आयुक्तालय तसेच पुणे जिल्हा परिक्षेत्रातून हद्दपार केलेबाबत**

दिनांक २३/०९/२०१९

दत्तवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे शुभम प्रकाश रोकडे वय-२१ रा. शाहू वसाहत, लक्ष्मी नगर, पुणे यास मुंबई पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ ३, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक २४/२०१९ दिनांक २३/०९/२०१९ रोजी सहा (०६) महीने करीता पुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हा परिक्षेत्रातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम त्याच्या गुंड साथीदारांसह बेकायदेशीर जमाव जमवून हत्याराचा वापर करून दरोडा टाकणेचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत करणे तसेच गैरकायद्याची मंडळी जमवून मालमत्तेचे नुकसान करणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द वारजे दत्तवाडी पोलीस ठाणेस वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास पौर्णिमा गायकवाड पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पुणे शहर यांनी पुणे शहर व पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हा परिक्षेत्रातून दोन (०२) वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.